अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे,

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती

## अहवाल

राष्ट्रीय सेवा योजना (एन.एस.एस.)

## जलसंधारण श्रमदान शिबीर अहवाल २०२२-२३

प्रा.डॉ. विलास कर्डिले
प्रा.डॉ.चंद्रकांत कांबळे
प्रा.डॉ.निरंजन शहा
प्रा.अस्मिता भगत

**शिबीराचे ठिकाण : मौजे अंजनगाव** **कालावधी : ०७ ते १३ जानेवारी २०२३**

राष्ट्रीय सेवा योजना, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे व राष्ट्रीय सेवा योजना तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती यांचे संयुक्त विद्यमाने विशेष श्रमसंस्कार शिबीर शनिवार दि. ०७ जानेवारी ते शुक्रवार दि. १३ जानेवारी २०२३ या कालावधीमध्ये दत्तक गाव मौजे अंजनगाव, ता.बारामती जि.पुणे येथे संपन्न झाले.

**उद्घाटन :**

शिबीराचे उद्घाटन सोमवार दि. ०७ जानेवारी २०२३ रोजी सकाळी ११.३० वा. मा.डॉ.चंद्रशेखर मुरूमकर, प्राचार्य, तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, श्री.बाळासाहेब परकाळे, माजी सदस्य सोमेश्वर सहकारी कारखाना, तर विशेष उपस्थितीमध्ये , उपसरपंच श्री.सुभाष वायसे, माजी सरपंच दिलीप परकाळे, श्री.सुभाष परकाळे मिनाज मुलानी, उपप्राचार्य, रजिस्ट्रार, ग्रामस्थांनी उपस्थित कार्यक्रम अधिकारी, ग्रामस्थ शिबीरार्थी यांच्या उपस्थितित संपन्न झाला.

‘युवकाचा ध्यास ग्राम-शहर विकास’ ही संकल्पना समोर ठेवून शिबीर काळात गाव परिसराची स्वच्छता, रस्त्याच्या कडेचे दगड, गवत, सपाटीकरण, अनावश्यक काटेरी झाडे, समाजमंदिर, मारूती मंदिर, दूध डेअरीच्या समोरील परिसर, वृक्षांना आळी करणे, ग्रामस्वच्छता, वनराई बंधार, शौचालय जनजागृती रॅली, स्मशानभूमी स्वच्छता, शिवार फेरीसाठी शिबीरार्थींना पक्षी निरीक्षण इ. उपक्रम राबविण्यात आले.

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

**१) शिबीरातील श्रमदान :**

**अ) वृक्षांना आळी करणे व वृक्ष लागवड :**

वृक्षांचे संवर्धन करण्यासाठी व पर्यावरण रक्षणासाठी गावपरिसर तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सोमेश्वर हायस्कूलसमोरील परिसरातील वृक्षांना आळी करण्यात आली. तसेच नव्याने शिबीराच्या माध्यमाधून जिल्हा परिषद आरोग्य केंद्र, स्मशानभूमी, गावांतील प्रमुख रस्त्यावर दुतर्फा व बऱ्हानपूर ते जळगाव येथील अंजनगाव ओढाच्या भारतीय जातींची चिंचेचे पाचशे झाडे लावण्यात आली. तसेच जिल्हा परिषद शाळेच्या आवारात औषधी वनस्पतींचा सुंदर बगिचा तयार करण्यात आला.

**क) ग्राम परिसराची स्वच्छता :**

'युवकाचा ध्यास ग्राम-शहर विकास' अंतर्गत महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून ग्राम स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या उपक्रमासाठी गावातील मंदिर, स्मशानभूमी स्वच्छता, ग्रामदैवत मंदिर परिसर स्वच्छता, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, अंजनगाव आदी परिसर प्लॅस्टिक तसेच काटेरी झुडपे, गवत इत्यादी नष्ट करून शिबीरार्थी विद्यार्थ्यांनी 'युवकाचा ध्यास ग्राम-शहर विकास' अंतर्गत गावाचे चित्र बदलून टाकले. तसेच स्मशानभूमी परिसरातील स्वच्छता, मंदीर परिसरातील व रस्त्याच्या कडेचे दगड, गवत, सपाटीकरण, अनावश्यक काटेरी झाडे तोडणे इ. प्रकारची कामे शिबीरादरम्याने स्वयंसेवकांनी केली.

**२) संस्कार**

**अ) व्याख्यानाचे आयोजन :**

शिबीर काळात विविध मान्यवरांनी शिबीरार्थींना मौलिक मार्गदर्शन केले यात प्रामुख्याने मा.डॉ.प्रशांत पाबरीकर मा. अच्युतराव शिंदे, डॉ. विजय शिंदे, डॉ.अमृता भोईटे पोलिस स्टेशन बारामती, डॉ. राजेंद्र दोशी (ढाकाळकर), प्रा.मनाजी गावडे, प्रा.किशोर ढाणे, प्रा.राजेंद्र आगवणे, डॉ. अजित तेळवे यांचा समावेश होता. तसेच महाविद्यालयाचे, उपप्राचार्य डॉ. अविनाश जगताप, डॉ. योगिनी मुळे, डॉ.सिमा नाईक-गासावी, डॉ.रामचंद्र सपकाळ, रजिस्ट्रार श्री. अभिनंदन शहा यांनी शिबीरस्थळी विशेष भेट देवून मोलाचे मार्गदर्शन केले.

ब**) योगा प्रशिक्षण :**

शिबीर काळामध्ये शिबीरार्थी विद्यार्थ्यांना रोज सकाळी ६ ते ६.३० प्रार्थना व ६.३० ते ७.३० योगसाधनेसाठी आपला वेळ दिला. शिबीरामध्ये योगसाधनेचे प्रशिक्षण पंतजली योगपीठाचे श्री. विजय केळकर यांच्या मार्फत देण्यात आले. या प्रशिक्षणाच्या माध्यमातून शिबीरार्थीना जीवनात व्यायामाबरोबर योगसाधनेचे व विपशनेचे महत्व समजले.

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

**क) शिवार फेरी :**

पक्षी निरीक्षणाचा आनंद वेगळाच असतो. निसर्गातील वेगवेगळया पक्षांचे निरीक्षण करणे त्यांच्या अभ्यासासाठी विद्यार्थ्यांना प्रवृत्त करणे या उद्देशाने शिबिरार्थीना शिवार फेरीसाठी सोनगांव येथील नदी परिसरमध्ये नेण्यात आले. शिबिरार्थी विद्यार्थ्यांनी यामध्ये उत्स्फुर्त सहभाग घेवून तसेच शेती फार्महाऊस मध्ये जावून शेतकऱ्यांशी चर्चा केली. शिवार फेरीसाठी, सरपंच, ग्रामसेविका ग्रामस्थ विशेष उपस्थित होते.

**ड) जनजागृती करणे :**

जनजागृती करण्यासाठी गावामध्ये रॅलीचे आयोजन करण्यात आले. यामध्ये बेटी बचाव, वृक्षलागवड व संवर्धन ग्रामस्वच्छता आरोग्य व विशेष महत्वपूर्ण शौचालय वापर विषयाबाबत जनजागृती केली. विद्यार्थ्यांनी गावातील प्रत्येक घरामध्ये जावून शौचालय वापर व त्यासंदर्भात माहिती देवून प्रबोधन करण्यात आले. याचा प्रभाव म्हणूनच सोनगांव हे गाव ९५ टक्के हगणदारी मुक्त झाले.

**३) आरोग्य**

**अ) संपूर्ण आरोग्य चिकित्सा शिबीर :**

बारामती येथील निरामय फाऊंडेशन यांच्या मार्फत डॉ. देशपांडे यांच्या उपस्थितीमध्ये शिबीरार्थी, मौजे गोजुबावी येथील ग्रामस्थ यांना संपूर्ण आरोग्याची तपासणी व त्या संबंधीचे मार्गदर्शन करण्यात आले या उपक्रमासाठी ग्रामस्थांची उपस्थिती विशेष उल्लेखनीय होती. सदर शिबीराचे उद्घाटन मा. प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर, तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती यांच्या हस्ते करण्यात आले. समारोप समारंभात शिबीरार्थी तसेच ग्रामस्थांच्या वतीने प्रा. चंद्रकांत कांबळे यांनी आभार मानले.

**ब) दंत चिकित्सा शिबीर :**

बारामती येथील दंतचिकित्सक डॉ.राजेंद्र दोशी-ढाकाळकर यांच्या उपस्थितीमध्ये शिबीरार्थी, मौजे गोजुबावी येथील ग्रामस्थ यांना दातांची निगा व त्या संबंधीचे मार्गदर्शन करण्यात आले या उपक्रमासाठी ग्रामस्थांची उपस्थिती विशेष उल्लेखनीय होती.

**४) अभिनव उपक्रम :**

**अ) अभिनव शाळा :**

शाळा व्यवस्थापन व शैक्षणिक कामकाज यांची योग्य माहिती मिळण्यासाठी व त्यासंदर्भाती खरा अनुभव देण्याच्या उद्देशाने शिबिरार्थी विद्यार्थ्यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सोनगाव येथे संपूर्ण शाळा शिबिरार्थीं मार्फत चालविण्यात आली.

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

**ब) आपत्ती व्यवस्थापनाचे मार्गदर्शन व प्रशिक्षण** : राष्ट्रीय सेवा योजनेच्या द्वितीय वर्षातील कु. अमोल वाघमोडे यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आयोजित अवाहन हा राष्ट्रीय स्तरावरील शिबीर पूर्ण केले असल्यामुळे आपल्या शिबीरातील अनुभव व तेथे आपत्ती व्यवस्थापनाचे घेतलेले प्रशिक्षण शिबीरार्थिंना शिबीराच्या माध्यमातून दिले.

**क) हळदीकुंकू स्मार्ट सूनबाई :**

हळदीकुंकू कार्यक्रमाचे आयोजन करून मौजे सोनगांव येथील महिलांशी शिबीरार्थीनी संवाद साधला त्याचबरोबर या संवादाचे माध्यमातून शौचालय असणे आरोग्याचे दृष्टीने किती महत्वाचे आहे हे पटवून देण्यात आले. त्याचबरोबर स्त्री आरोग्य संदर्भात चर्चा देखील झाली महिलांनी यामध्ये उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. तसेच महाविद्यालयातील प्रा.अमोल बनकर व कवी सोमनाथ कदम यांच्या साहयाने ग्रामीन महिलासाठी स्मार्ट सूनबाई हा खेळ पैठणी अशा प्रकारे खेळाचे आयोजन करण्यात आले.

**ड) आत्मसुरक्षा मार्गदर्शन व प्रशिक्षण :** राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबीरात सहभागी झालेल्या सर्व शिबीरार्थिंना आत्मसुरक्षा मार्गदर्शन व प्रशिक्षण सात दिवस दिले. त्याचा शिबीरार्थिंना स्वसंरक्षणार्थ निश्चितच फायदा होईल.

**इ) विविध गुणदर्शन मार्गदर्शन प्रशिक्षण :**

शिबिरार्थींमधील विविध गुणदर्शन करण्याची संधी व त्याची योग्य माहिती व मार्गदर्शन करण्यासाठी बारामती येथील प्रा. भीमराव तोरणे, प्रा. कंडारे आर. डी., श्री.स्वामी राज भिसे यांनी एकपात्री प्रयोग, पथनाटय, मकअभिनय, नृत्य (सामुहिक व एकपात्री) यांचे विशेष व्याख्यान व प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. प्रा. भिमराव तोरणे यांनी पथनाटय, एकपात्री, नाटक व अभिनय या संबंधीचे मार्गदर्शन व असणाऱ्या संधीचे मार्गदर्शन केले.

५) **सांस्कृतिक कार्यक्रम :**

शिबिरार्थी आणि अंजनगाव येथील युवकांच्या संयुक्त विद्यमाने जनजागृती आणि प्रबोधनपर सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले. यामध्ये लोकगीते, विनोदी नाटीका, प्रबोधनपर पथनाट्य यासारख्या कार्यक्रमाचे माध्यमातून सामाजिक प्रश्न अंधश्रध्दा व इतर वाईट प्रथा यावर विशेष भर देण्यात आला या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन प्रा.भिमराव तोरणेसर, प्रा. विलास कर्डिले व डॉ. चंद्रकांत कांबळे यांनी केले.

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

## ६) समारोप समारंभ :

शिबीराचा समारोप दि. १३ जानेवारी २०२३ रोजी माजी सरपंच मा.श्री.दिलीप परकाळे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. या समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून मा.प्राचार्य डॉ.चंद्रशेखर मुरूमकर उपस्थित होते. तर विशेष उपस्थितीमध्ये श्री.बाळासाहेब परकाळे, माजी सदस्य सोमेश्वर सहकारी कारखाना, तर विशेष उपस्थितीमध्ये , उपसरपंच श्री.सुभाष वायसे, माजी सरपंच दिलीप परकाळे, श्री.सुभाष परकाळे, मिनाज मुलानी व ग्रामस्थांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढविली. या विशेष श्रमसंस्कार शिबीराच्या यशस्वीतेसाठी प्रा. विलास कर्डिले (जिल्हा समन्वयक रा.सो.यो.) कार्यक्रम अधिकारी डॉ.चंद्रकांत कांबळे, डॉ. निरंजन शहा तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व समिती सदस्य यांनी विशेष प्रयत्न केले.

## ७) शिबीराचे ठळक वैशिष्टये :

१) ५०० पेक्षा जास्त नविन भारतीय जातीची वृक्ष लागवड व असणाऱ्या वृक्षांना आळी केली.

२) मंदिर, स्मशानभूमी, शाळेचे मैदान, ग्रामपंचायत, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आदी परिसर स्वच्छ करण्यात आला.

४) महिलांसाठी हळदीकुंकू कार्यक्रमाचे आयोजन केले.

५) समाज प्रबोधनासाठी रॅली, पथनाटयाचे आयोजन.

६) योग प्रशिक्षण स्वयंसेवकांना दिले.

७) अनेक मान्यवरांची व्याख्याने आयोजित करण्यात आली.

८) शिबीराच्या माध्यमातून शिबिरार्थीचा सर्वांगीण विकासाच्या दिशेने वाटचालीच पूरक ठरला.

९) स्वंयसेवकांना सामाजिक प्रश्नांची जाणीव होवून, समाज कार्यामध्ये त्यांनी सक्रीय योगदान दिले.


१०) समाजातील अनेक प्रश्नांबाबत जनजागृती करून ते सोडविण्यासाठी मार्गदर्शन, मदत, जनजागृती करण्यात आली.

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

## ८) शिबीर काळातील छायाचित्रे :

| | |
|---|---|
| शिबीर पूर्व संध्या ध्वज संचलन व उद्‌घाटन | मा.डॉ.प्रमोद पाबरीकर रू.सा., संचालक यांचे स्वागत |
|   |  |
| उदघाटन प्रसंगी प्रमूख पाहून्याच्या समवेत समूह छायाचित्र | मा.प्रमोद पाबरेकर संचालक रूसा यांच्या समवेत |
|  |  |
| स्मशान भुमी परिसर रस्ता निर्मिती व सुशोभिक्ण करताना स्वयंसेवक | ग्राम परिसर स्वच्छ करताना स्वयंसेवक |
|  |  |

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

<table>
<tr><td>उत्कृष्ठ शिबीरार्थी</td><td>उत्कृष्ठ शिबीराथी</td></tr>
<tr><td></td><td></td></tr>
<tr><td>उत्कृष्ठ शिबीराथी</td><td>उत्कृष्ठ शिबीराथी</td></tr>
<tr><td></td><td></td></tr>
<tr><td>समारोप प्रसंगी मार्गदर्शन करताना मा.प्राचार्य</td><td>समारोप प्रसंगी समूह छायाचित्र</td></tr>
<tr><td></td><td>
</td></tr>
</table>

(प्रा. विलास कर्डिले)
शिबीर प्रमुख

(डॉ.चंद्रशेखर मुरूमकर)
प्राचार्य